# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. मॅथेमॅटिकल सायन्स या चार वर्षीय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून २९जून पर्यंत प्रवेशाची मुदत देण्यात आली आहे.

या प्रशाळेत सन २०१० पासून बी.एस्सी. (अ‍ॅक्च्युरियल सायन्स) हा अभ्यासक्रम सुरु केला होता. आता गतवर्षा पासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी.एस्सी. मॅथेमॅटिकल सायन्स हा चार वर्षीय अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली असून २९ जूनपर्यंत प्रवेश प्रक्रिया सूरू राहणार आहे. या अभ्यासक्रमासाठी मुख्य विषय (मेजर) सांख्यिकी किंवा अ‍ॅक्चुरियल सायन्स हे विषय असुन उपविषय (मायनर) डाटा सायन्स किंवा अर्थशास्त्र निवडता येणार आहे. स्टॅटिस्टिक्स किंवा अ‍ॅक्च्युरियल सायन्स क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे. गतवर्षी या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी आठ विद्यार्थ्यांनी पहिल्याच प्रयत्नात अ‍ॅक्च्युरियल सायन्सशी संबंधीत एसीईटी परीक्षा उत्तीर्ण केली. प्रवेशित विद्यार्थी संख्याशास्त्रा सोबत सॉफ्टवेअर्स मध्ये पारंगत होतात. १२ वी (कला, वाणिज्य व विज्ञान) मधील गणिताच्या गुणांच्या आधारे प्रवेश दिले जातील. अशी माहिती संचालक प्रा. एस.आर. चौधरी व विभागप्रुख प्रा. आर.एल. शिंदे यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल माहेश्वरी यांचे महाराष्ट्र राज्य पात्रता चाचणीच्या (सेट) सुकाणू समितीवर नामनिर्देशन करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु यांनी हे नामनिर्देशन केले आहे. या विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी राज्य पात्रता चाचणी परीक्षेचे आयोजन केले जात असते. प्रा. माहेश्वरी यांचे या नियुक्तीबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ७ जून, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी